# ... तर साई माफ करणार नाही

शिर्डी येथील श्री साईबाबा समाधीला २०१८ साली शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. यासाठी २०१८ साली जागतिक दर्जाचा उत्सव व्हावा म्हणून महाराष्ट्र सरकारने शताब्दी महोत्सवासाठी ३ हजार कोटींचा निधी मंजूर केला. पण ज्या श्री साईंच्या समाधी शताब्दी महोत्सवासाठी हे ३ हजार कोटी रुपये सरकार खर्च करणार आहे, त्या श्री साईंना हे आवडेल का? त्यांना आनंद वाटेल का?

श्री साईंचे संपूर्ण आयुष्य फाटके कपडे आणि पोटापुरते अन्न यात गेले. निरपेक्ष समाजसेवा करणारे ते कर्मयोगी होते. फाटके कपडे आणि डोईवर कफनी बांधून ते आले आणि त्याच स्थितीत गेले. शेवटपर्यंत पोटापुरते अन्न यापलीकडे त्यांनी काहीच साठवले नाही. दु:खी, पीडित समाजाला मार्ग दाखवायचा आणि मदत करायची हे त्यांच्या जीवनाचे सार होते. आजच्या युगात अशी व्यक्तिमत्त्वे घडतील यावर कुणाचा विश्वासच बसणार नाही. म्हणूनच त्यांनी समाधी घेऊन शंभर वर्षे झाल्यावरही आपण त्यांची आठवण काढतो. आजही दु:खात, संकटात आणि आनंदातही शिर्डीची वारी होते.

अशा श्री साईंच्या समाधी सोहळ्यावर ३ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत, हे ऐकून साईंना काय वाटले असावे? त्यांना दु:ख झाले असेल. ते म्हणत असतील की, माझ्या कार्यातून मी जो संदेश दिला तो माझ्या भक्तांना कळलाच नाही. मी सेवेचे व्रत घेतले आणि माझे भक्त संपत्तीची आरास बांधतायत. कशासाठी? कुणासाठी? मला मोगऱ्याची फुलं आवडतील. भाकरी-भाजीने मी समाधानी होईन. माझ्या भक्तांनी कुणाचे अश्रू पुसले तर मी शांतपणे झोपेन. पण माझ्या भक्तांनी मला सोन्याने मढवून ठेवलेय. ज्या सोन्याला मी मातीसमान मानले त्याच सोन्याच्या सिंहासनावर मला बसवले. आता माझ्या समाधी सोहळ्यावर ३ हजार कोटी खर्च करणार? जागतिक महोत्सव करणार? अशा महोत्सवातून त्यागाचा आणि सेवेचा संदेश जाऊ शकतो का? माझ्या प्रतिमेपुढे जग झुकते, भरभरून दान देते. मात्र मला आनंद वाटत नाही. कारण हे सर्वजण माझा संदेश, माझे कार्यच विसरून गेले आहेत. मी माझ्या आयुष्यात कधी सोन्याची चेन काढून दाखवली नाही. फक्त धीर दिला, पाठीवर हात ठेवला आणि दु:ख दूर करण्याचा प्रयत्न केला. पण माझे भक्त म्हणवणारी ही माणसे चुकीच्या मार्गाने चालली आहेत.

महाराष्ट्राचे सरकार कर्जबाजारी आहे. त्यांच्याकडे

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

शेतमालाला हमीभाव देण्यासाठी पैसे नाहीत. तूरडाळ साठवायला बारदाने आणण्यासाठी पैसे नाहीत. शेतकऱ्यांना बी-बियाणे मोफत द्यायला पैसे नाहीत. शेतकऱ्यांच्या मुलींची लग्ने आम्ही थाटात लावून देतो असे हे सरकार म्हणत नाही. रोज एक शेतकरी आत्महत्या करतो आहे. तरुण शेतकरी आत्महत्या करीत आहे. अगदी आधुनिक तंत्रज्ञानाने शेती केलेला शेतकरीही जीव देतो आहे. कितीसे कर्ज असते त्यांचे? ५० हजार, एक लाख नाहीतर दोन लाख इतकेच कर्ज असते, पण तेही फेडू शकत नाहीत म्हणून आत्महत्या करू लागले आहेत. सरकारने विद्यार्थ्यांची फी माफ केली, पण त्याच्या पोटात दोन घास अन्न जात नाही त्याचे काय? आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार कोण देईल? त्या माऊलीचे अश्रू कोण पुसेल? शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजूनही थांबलेल्या नाहीत. या वर्षी दुष्काळ पडणार असे भाकीत आहे. तसे झाले तर हाहाकार माजेल.

शेतकऱ्यांना मदत केली तर आर्थिक शिस्त बिघडते असे मुख्यमंत्री म्हणतात. मग शेतकऱ्यांना मरायला सोडून श्री साई समाधी उत्सवावर ३ हजार कोटी मंजूर केलेत तेव्हा आपण श्री साईंच्या कार्याचा अपमान करतो आहोत असे वाटले नाही का? समाधी सोहळ्यासाठी ३ हजार २३ कोटी सरकार देणार आहे. त्यातील १५७ कोटी दर्शन रांग उभारण्यासाठी, १४१ कोटी तारांगण आणि मेणाच्या मूर्तींच्या संग्रहालयासाठी, ७२ कोटी लेझर शोसाठी, २७ कोटी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी आणि ५९ कोटी वाढीव पाणीपुरवठ्यावर पहिल्या टप्प्यात खर्च होणार आहेत. या इतक्या रकमेत शेकडो शेतकरी कुटुंबे वाचतील. शेतकऱ्यांना वाचवायला पैसा नाही आणि तारांगण, म्युझियम, लेझर शोवर उधळायला सरकारकडे पैसा आहे? विमानतळासाठी पैसा आहे, पण अनाथ झालेल्या शेतकऱ्यांच्या लेकरांसाठी पैसा नाही?

श्री साईंचा समाधी शताब्दी सोहळा हा अत्यंत साधेपणाने आणि मनोभावे साजरा झाला पाहिजे. एक हजार शेतकरी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या चेहऱ्यावर फुलणारे हसू या महोत्सवात दिसले पाहिजे. शेतकऱ्यांच्या मालासाठी मुंबईच्या मध्यभागी मोठे मार्केट बांधून त्या मार्केटचे उद्घाटन या महोत्सवात झाले पाहिजे. हुंडा देता येत नाही म्हणून लग्न थांबलेल्या आपल्या लेकींचे सामूहिक विवाह या महोत्सवाच्या दरदिवशी थाटात झाले पाहिजेत. शेतकऱ्यांच्या मुलांची फी सरकारने माफ केली. या मुलांचा वर्षभराचा हॉस्टेलचा खर्च आणि जेवणाचा खर्च भरून त्याच्या पावत्या साईचरणी रोज अर्पण करून महोत्सव झाला पाहिजे. श्रमदान झाले पाहिजे, बी-बियाणे, खतांचे मोफत वाटप दरदिवशी झाले पाहिजे. मुख्यमंत्र्यांना हा सोहळा जागतिक दर्जाचा करायचा आहे ना? मग श्री साईंचा संदेश अशा समाजोपयोगी कामांनी पोचवला तर जगात वाहवा तर होईलच, पण श्री साईंनी सांगितलेला मार्ग जगभरात पोचेल. लेझर शो आणि म्युझियमने जे घडू शकत नाही ते सामाजिक उपक्रमांनी घडेल.



हिंदूंच्या उत्सवांवर फक्त टीका करता असे काही जण म्हणतील. होय, आम्ही टीका केली. जे जे अनिष्ठ आणि अयोग्य असते त्यावर आवाज उठवायचा हेच हिंदू धर्माने शिकवले आहे. त्यातूनच हिंदू धर्म समृद्ध होत गेला आणि होत जाईल. शेतकरी मदतीविना मरतोय आणि श्री साईंसमोर ७२ कोटींचा लेझर शो सुरू आहे हे होऊ नये. ३ हजार कोटी रुपये अनेकांचे जीव वाचवू शकतात. पण जीव न वाचवता ही रक्कम झगमगाटासाठी उधळलीत तर श्री साई माफ करणार नाहीत.

आत्महत्या करतो आहे. तरुण शेतकरी आत्महत्या करीत आहे. अगदी आधुनिक तंत्रज्ञानाने शेती केलेला शेतकरीही जीव देतो आहे. कितीसे कर्ज असते त्यांचे? ५० हजार, एक लाख नाहीतर दोन लाख इतकेच कर्ज असते, पण तेही फेडू शकत नाहीत म्हणून आत्महत्या करू लागले आहेत. सरकारने विद्यार्थ्यांची फी माफ केली, पण त्याच्या पोटात दोन घास अन्न जात नाही त्याचे काय? आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार कोण देईल? त्या माऊलीचे अश्रू कोण पुसेल? शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजूनही थांबलेल्या नाहीत. या वर्षी दुष्काळ पडणार असे भाकीत आहे. तसे झाले तर हाहाकार माजेल.

शेतकऱ्यांना मदत केली तर आर्थिक शिस्त बिघडते असे मुख्यमंत्री म्हणतात. मग शेतकऱ्यांना मरायला सोडून श्री साई समाधी उत्सवावर ३ हजार कोटी मंजूर केलेत तेव्हा आपण श्री साईंच्या कार्याचा अपमान करतो आहोत असे वाटले नाही का? समाधी सोहळ्यासाठी ३ हजार २३ कोटी सरकार देणार आहे. त्यातील १५७ कोटी दर्शन रांग उभारण्यासाठी, १४१ कोटी तारांगण आणि मेणाच्या मूर्तींच्या संग्रहालयासाठी, ७२ कोटी लेझर शोसाठी, २७ कोटी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी आणि ५९ कोटी वाढीव पाणीपुरवठ्यावर पहिल्या टप्प्यात खर्च होणार आहेत. या इतक्या रकमेत शेकडो शेतकरी कुटुंबे वाचतील. शेतकऱ्यांना वाचवायला पैसा नाही आणि तारांगण, म्युझियम, लेझर शोवर उधळायला सरकारकडे पैसा आहे? विमानतळासाठी पैसा आहे, पण अनाथ झालेल्या शेतकऱ्यांच्या लेकरांसाठी पैसा नाही?

श्री साईंचा समाधी शताब्दी सोहळा हा अत्यंत साधेपणाने आणि मनोभावे साजरा झाला पाहिजे. एक हजार शेतकरी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या चेहऱ्यावर फुलणारे हसू या महोत्सवात दिसले पाहिजे. शेतकऱ्यांच्या मालासाठी मुंबईच्या मध्यभागी मोठे मार्केट बांधून त्या मार्केटचे उद्घाटन या महोत्सवात झाले पाहिजे. हुंडा देता येत नाही म्हणून लग्न थांबलेल्या आपल्या लेकींचे सामूहिक विवाह या महोत्सवाच्या दरदिवशी थाटात झाले पाहिजेत. शेतकऱ्यांच्या मुलांची फी सरकारने माफ केली. या मुलांचा वर्षभराचा हॉस्टेलचा खर्च आणि जेवणाचा खर्च भरून त्याच्या पावत्या साईचरणी रोज अर्पण करून महोत्सव झाला पाहिजे. श्रमदान झाले पाहिजे, बी-बियाणे, खतांचे मोफत वाटप दरदिवशी झाले पाहिजे. मुख्यमंत्र्यांना हा सोहळा जागतिक दर्जाचा करायचा आहे ना? मग श्री साईंचा संदेश अशा समाजोपयोगी कामांनी पोचवला तर जगात वाहवा तर होईलच, पण श्री साईंनी सांगितलेला मार्ग जगभरात पोचेल. लेझर शो आणि म्युझियमने जे घडू शकत नाही ते सामाजिक उपक्रमांनी घडेल.

हिंदूंच्या उत्सवांवर फक्त टीका करता असे काही जण म्हणतील. होय, आम्ही टीका केली. जे जे अनिष्ठ आणि अयोग्य असते त्यावर आवाज उठवायचा हेच हिंदू धर्माने शिकवले आहे. त्यातूनच हिंदू धर्म समृद्ध होत गेला आणि होत जाईल. शेतकरी मदतीविना मरतोय आणि श्री साईंसमोर ७२ कोटींचा लेझर शो सुरू आहे हे होऊ नये. ३ हजार कोटी रुपये अनेकांचे जीव वाचवू शकतात. पण जीव न वाचवता ही रक्कम झगमगाटासाठी उधळलीत तर श्री साई माफ करणार नाहीत.